२३९१५

क्र.स्था-१८ /ब/ वलेअ अहवाल/ न.क्र. १८३/

**स्थानिक निधी लेखापरीक्षा,**
**संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**सहावा मजला, कोंकण भवन.**
**नवी मुंबई. ४०० ६१४.**

**स्थायी आदेश क्र. ०८ /२०१७,** **दिनांक :- 15 MAY 2017**

विषय :- जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखापरीक्षणासंदर्भातील मार्गदर्शक सुचना.

**प्रस्तावना :-**

मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम १९३० व नियम १९३१ नुसार स्थानिक स्वराज्य संस्थांचे लेखापरीक्षण स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालयाच्या अधिनस्त जिल्हा कार्यालयांकडून करण्यात येते. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण अधिक प्रभावी व सुलभ होण्याकरीता लेखापरीक्षणासाठी आवश्यक माहिती लेखापरीक्षणापूर्वी जिल्हा सहाय्यक संचालक व लेखापरीक्षण पथकाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे.

जिल्हा कार्यालयांनी जिल्हा परिषद विभाग व पंचायत समितीचे निर्गमित केलेल्या लेखापरीक्षण अहवालाचे संचालनालय स्तरावर तपासणी केली असता जिल्हा कार्यालयांकडून जिल्हा परिषदेच्या विभागांचे लेखापरीक्षण अहवालाच्या मांडणीमध्ये भिन्नता दिसून येत आहे. तसेच जिल्हा परिषद व पंचायत समित्यांकडून केलेली बांधकामे/ विकास कामे व खरेदी प्रस्तावातील अनयिमिततेसंदर्भातील लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांमध्ये आवश्यक ती सर्व माहिती नमुद नसल्याचे दिसून आले. यास्तव जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण सुरु होण्यापुर्वी प्राप्त करावयाची माहिती, बांधकाम व खरेदीच्या प्रस्तावांच्या अनियमिततेसंदर्भातील परिच्छेदांमध्ये आवश्यक त्या सर्व माहितीचा अंतर्भाव होण्यासाठी व जिल्हा परिषद विभागांचे निर्गमित करावयाच्या लेखापरीक्षण अहवालातील मांडणीमध्ये सर्व जिल्हा कार्यालयात एकसुत्रता आणण्यासाठी खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**आदेश :-**

**अ ) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांचे लेखापरीक्षण सुरु होण्यापुर्वी जिल्हा सहाय्यक संचालक यांनी खालील बाबींची माहिती घ्यावी.**

१. संचालनालयाचे आदेश क्र. १८८४, दि. २७.०९.२०१६ नुसार जिल्हा परिषद / पंचायत समिती यांच्याकडील पूर्ण झालेल्या बांधकामांची यादी.

२. जिल्हा परिषद / पंचायत समिती यांनी केलेल्या रु.५०,०००/- पेक्षा जास्त किमतीच्या सर्व खरेदीच्या प्रस्तांवाची यादी.

३. जिल्हा परिषदेतील विभाग प्रमुखांकडील साठा नोंदवही (Stock Book) क्र.३३ प्रमाणे दि.३१.०३.२०१७ रोजी वस्तुनिहाय शिल्लक असलेला साठा.

४. जिल्हा परिषदेतून पंचायत समितीला वाटप केलेले साहित्य/ वस्तु इत्यादींची माहिती (उदा. वाटप

आदेश) प्राप्त करुन घेणे व पंचायत समितीच्या लेखापरीक्षणादरम्यान सदरचे साहित्य / वस्तु पंचायत समितीच्या साठा नोंदवहीत जमा झाले किंवा नाही हे लेखापरीक्षणादरम्यान तपासणे.

५. लेखापरीक्षणादरम्यान ज्या प्राथमिक आरोग्य केद्रांना भेटी द्यावयाचे आहे त्या केद्रांना जिल्हा परिषद यांनी वाटप केलेले औषधे / साहित्य इत्यांदीच्या आदेशांची माहिती घेणे व सदरचे वाटप केलेले औषधे / साहित्य संबंधित प्राथमिक आरोग्य केद्रांच्या साठा नोंदवहीत जमा झाले किंवा नाही हे लेखापरीक्षणादरम्यान तपासणे.

६. जिल्हा परिषदेच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्याकडून पंचायत समितींना वाटप केलेल्या वित्तप्रेषणाची माहिती घेणे व पंचायत समितींच्या लेखापरीक्षणादरम्यान रोख नोंदवहीची ताळमेळ घेणे.

७. जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील सर्व लाभांर्थींच्या प्रस्तांवाची माहिती संबंधित खाते प्रमुखांकडून प्राप्त करुन घेणे.

८. पंचायत समित्यांकडील साठा नोंदवही (Stock Book) प्रमाणे दि. ३१.०३.२०१७ रोजी वस्तुनिहाय शिल्लक असलेला साठा.

९. पंचायत समिती व जिल्हा परिषद विभागनिहाय राबविलेल्या योजनांची योजनानिहाय माहिती व सदर योजनेस प्राप्त शासन अनुदान व त्यावर झालेल्या एकूण खर्चाचा तपशील.

**ब ) जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखापरीक्षण अहवाल तयार करतांना घ्यावयाची दक्षता.**

१. बांधकामाचा परिच्छेद नोंदवितांना खालील बाबींचा उल्लेख संक्षिप्त माहितीमध्ये असावा.

- लेखाशिर्ष.
- कामाचे नाव व अदांजपत्रकिय रक्कम.
- प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व रक्कम.
- तांत्रिक मान्यतेचा दिनांक व रक्कम.
- कामाचा आदेश क्रमांक व दिनांक.
- ठेकेदाराचे नाव,
- निविदा रक्कम व प्राप्त दर.
- निविदेचा कालावधी - दि. ------ पासून दि.------ पर्यंत, एकूण ----- दिवस.
- जाहिर निवीदा दिली असलेल्या वर्तमानपत्रांची नावे.
- कामाचे मुल्यांकन
- मोजमाप पुस्तिका क्र. व पृष्ठ क्र.
- प्रमाणक क्रमांक , दिनांक व रक्कम.

२. खरेदीच्या अनियमिततेसंदर्भातील परिच्छेद नोंदवितांना खालील बाबींचा उल्लेख संक्षिप्त माहितीमध्ये असावा.

- लेखाशिर्ष
- वस्तु/ साहित्य खरेदीचे नाव.
- प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व रक्कम.

२४७/५

- तांत्रिक मान्यतेचा दिनांक व रक्कम.
- खरेदीचे आदेश क्रमांक व दिनांक.
- निविदा रक्कम.
- निविदेचा कालावधी - दि. ------ पासून दि.------ पर्यंत.
- पुरवठा आदेश.
- पुरवठादाराचे नाव.
- वस्तुचे /साहित्याचे मंजुर दर.
- प्रमाणक क्रमांक , दिनांक व रक्कम.

सदर आदेशातील सुचनांचे काटेकोरपणे पालन होईल, याची दक्षता घ्यावी.

(प्रताप मोहिते)
संचालक,
स्थानिक निधी लेखापरीक्षा,
महाराष्ट्र राज्य

प्रत:-

१. सहसंचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोंकण/ पुणे/ नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ नागपूर.
२. सहाय्यक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, --- सर्व---